# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 04 February 2025

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०४ फेब्रुवारी २०२५ सकाळी ७.१० मि.**

****

- संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रस्तावावर चर्चेला प्रारंभ
- महाराष्ट्रासाठी रेल्वे अंदाजपत्रकात २३ हजार ७७८ कोटी रुपये, २०१४ नंतर एकाच वर्षात २० पट तरतूद
- राज्यात एक लाख ९४ हजार विशेष कार्यकारी अधिकारी नियुक्त केले जाणार

आणि

- ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र १५ सुवर्ण पदकांसह तिसऱ्या स्थानावर

****

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रस्तावावर काल चर्चा सुरु झाली. लोकसभेत भाजपाचे रामवीरसिंह बिधुडी यांनी, तर राज्यसभेत भाजपच्या किरण चौधरी यांनी चर्चेला प्रारंभ केला. या चर्चेदरम्यान विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी, कुंभमेळ्यात झालेल्या चेंगराचेंगरीतल्या मृतांबाबत केलेल्या विधानावर, सत्ताधारी पक्षाने आक्षेप घेतला, सभापतींनीही त्यांना हे विधान मागे घेण्याची सूचना केली. तृणमूलचे डेरेक ओ ब्रायन, द्रमुकचे एम षण्मुगम्, शिवसेनेचे मिलिंद देवरा यांनी या चर्चेत सहभाग घेतला.

लोकसभेत भाजपचे रविशंकर प्रसाद, द्रमुकच्या कनिमोळी, तृणमूल काँग्रेसच्या काकोली घोष, समाजवादी पक्षाचे नरेश पटेल, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अरविंद सावंत, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे डॉ अमोल कोल्हे, शिवसेनेचे श्रीरंग बारणे, यांच्यासह विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी या चर्चेत सहभाग घेतला. परराष्ट्र मंत्र्यांच्या अमेरिका दौऱ्याबाबत गांधी यांनी केलेल्या

विधानावर संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांच्यासह सत्ताधारी सदस्यांनी आक्षेप घेतला, परराष्ट्र मंत्र एस जयशंकर यांनीही गांधी यांचं हे विधान खोडून काढलं.

****

त्रिभुवन सहकारी विद्यापीठ विधेयक २०२५ काल लोकसभेत सादर करण्यात आलं. गुजरातमध्ये आणंद इथं हे विद्यापीठ स्थापन होणार असून, सहकारातून समृद्धी हे उद्दिष्ट गाठण्याच्या हेतूने व्यवस्थापकीय आणि तांत्रिक शिक्षण तिथे दिलं जाईल. केंद्रीय सहकार राज्यमंत्री कृष्णपाल गुर्जर यांनी विधेयक सभागृहात सादर केलं.

****

यंदाच्या अर्थसंकल्पात रेल्वेसाठी दोन लाख ५२ हजार २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून पत्रकार परिषद घेत, ही माहिती दिली. यामध्ये नवीन रेल्वे मार्गांसाठी ३२ हजार २३५ कोटी रुपये, मार्गिकांच्या नूतनीकरणासाठी २२ हजार ८०० कोटी आणि रेल्वेमार्गाच्या दुपदरीकरणासाठी ३२ हजार कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे. १६ हजार २४० कोटी रुपयांची नवीन रेल्वे मार्गिकांची कामं देशभरात सुरू असून, या आर्थिक वर्षात ५० नवीन नमो भारत गाड्या, १०० नवीन अमृत भारत गाड्या आणि २०० नवीन वंदे भारत गाड्या सुरू करण्याची योजना असल्याचं, वैष्णव यांनी सांगितलं.

महाराष्ट्रासाठी रेल्वे अंदाजपत्रकात २३ हजार ७७८कोटी रुपयांची तरतूद असल्याची माहितीही वैष्णव यांनी दिली, ते म्हणाले..

> ***''चार लाख साठ हजार करोड के नये बजेट सँक्शन हुये है। महाराष्ट्र का ॲलोकेशन इस बार, रेकॉर्ड ॲलोकेशन है, तेईस हजार सात सौ अठहत्तर करोड रूपये का ॲलोकेशन है। महाराष्ट्र मे काम बहोत तेजी से चल रहा है।''***

दरम्यान, महाराष्ट्रातल्या रेल्वे प्रकल्पांसाठी अर्थसंकल्पात केलेल्या या तरतुदीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रेल्वेमंत्री वैष्णव यांचे आभार मानले आहेत.

****

प्रधानमंत्री आवास योजना, शहरी आवास योजनांना गती द्यावी, जलजीवन मिशनची कामं वेगाने पूर्ण करावीत तसंच आयुष्मान कार्ड वितरणातल्या त्रुटी दूर करून कार्डचं वाटप पूर्ण करण्याचे निर्देश, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांचा काल मुंबईत आढावा घेताना, ते बोलत होते.

दरम्यान, मृद आणि जलसंधारण विभागाने काल मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत विविध संस्था आणि संघटनांसोबत तीन सामंजस्य करार केले. यामध्ये नाम फाउंडेशन, टाटा मोटर्स आणि भारतीय जैन संघटनेचा सहभाग आहे. या योजनेंतर्गत राज्यात २३ जिल्ह्यांमधल्या किमान एक हजार जलाशयांमधला गाळ काढून त्यांची साठवण क्षमता वाढवण्याचा करार करण्यात आला.

****

कृषी क्षेत्रात एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर विचाराधीन असून, त्यासाठी व्यवहार्यता तपासून पाहावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. या संदर्भात काल मंत्रालयात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. पीक आरोग्याचं विश्लेषण, मातीतल्या कार्बनचं प्रमाण शोधणं, मातीच्या आरोग्याविषयी सविस्तर माहिती, कीड तसंच रोगांचा प्रादुर्भाव ओळखणं एआयच्या वापरामुळे शक्य होणार आहे. त्यामुळे एआयच्या प्रायोगिक तत्त्वावर वापरासाठी या प्रकल्पाची तांत्रिक आणि आर्थिक व्यवहार्यता तपासून पाहावी, असे निर्देशही पवार यांनी दिले.

****

राज्यभरात प्रत्येक पाचशे मतदारांमागे कार्यकारी अधिकारी याप्रमाणे एक लाख ९४ हजार विशेष कार्यकारी अधिकारी नियुक्त केले जाणार असल्याची माहिती, राज्य निवड समितीचे अध्यक्ष तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. विशेष कार्यकारी अधिकारी नियुक्ती संदर्भातला सुधारित शासन निर्णय काल जारी करण्यात आला. प्रत्येक ठिकाणी ३३ टक्के महिलांची नियुक्ती केली जाणार असून, या पदावरील व्यक्तीचा कालावधी पाच वर्षांचा असेल, तसंच ग्रामसभेत या अधिकाऱ्यांना विशेष निमंत्रित केलं जाईल, असं या शासन निर्णयात नमूद करण्यात आलं आहे.

****

महिलांना औद्योगिक क्षेत्रात सक्षम करण्यासाठी तालुकास्तरावर अस्मिता भवन उभारण्याच्या प्रक्रियेस गती द्यावी, असे निर्देश, महिला आणि बालविकास मंत्री

आदिती तटकरे यांनी दिले आहेत. त्या काल याबाबतच्या आढावा बैठकीत बोलत होत्या. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या ५० व्या वर्धापन दिनानिमत्त महामंडळाअंतर्गत असलेल्या जास्तीत जास्त बचतगटांना व्यासपीठ उपलब्ध व्हावं, तसंच महामंडळाचं कार्य ग्रामीण भागातही पोहोचावं, यासाठी राज्यस्तरीय महोत्सवाचं आयोजन करण्याचे निर्देशही तटकरे यांनी दिले.

****

उत्तर प्रदेशात प्रयागराज इथं सुरु असलेल्या महाकुंभमेळ्यात वसंत पंचमीनिमित्त तिसरं अमृत स्नान काल पार पडलं. १३ आखाड्यांमधल्या साधुसंतांसह जगभरातून आलेल्या दोन कोटी ३३ लाखाहून अधिक भाविकांनी पवित्र संगमावर स्नान केलं. दरम्यान, यंदाचा हा महाकुंभमेळा सुरू झाल्यापासून आतापर्यंत जवळपास ३६ कोटीहून अधिक भाविकांनी पवित्र स्नान केल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

भारतीय – अमेरिकन गायिका चंद्रिका टंडन यांनी आपल्या त्रिवेणी अल्बम करिता ग्रॅमी पुरस्कार पटकावला आहे. काल अमेरिकेत लॉस अँजेलिस इथं हा ६७ वा वार्षिक पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चंद्रिका टंडन यांचं अभिनंदन केलं आहे.

****

सलग दुसऱ्यांदा १९ वर्षांखालील टी–२० विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय महिला क्रिकेट संघाला भारतीय क्रिकेट नियामक मंडळ–बीसीसीआयने पाच कोटी रुपयांचं बक्षीस जाहीर केलं आहे. या संघाने पहिला टी–२० विश्वचषक २०२३ मध्ये शेफाली वर्मा हिच्या नेतृत्वाखाली जिंकला, तर निकी प्रसाद हिच्या नेतृत्वाखालील दुसऱ्यांदा विश्वचषकावर नाव कोरलं.

****

३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र १५ सुवर्ण पदकांसह तिसऱ्या स्थानावर आहे. मात्र २६ रौप्य आणि २० कांस्य पदकं जिंकून महाराष्ट्राने सर्वाधिक ६१ पदकं जिंकली आहेत. सेना दल संघाला २२ आणि कर्नाटकला १९ सुवर्णपदकं मिळाली आहेत. मणिपूर ११ सुवर्ण पदकांसह चौथ्या तर मध्यप्रदेश दहा सुवर्ण पदकांसह पाचव्या स्थानावर आहे.

****

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेने पहेलवान महेंद्र गायकवाड आणि शिवराज राक्षे यांच्यावर तीन वर्षांची बंदी घातली आहे. या दोन्ही पहेलवानांनी महाराष्ट्र केसरी स्पर्धेत पंचांशी वाद घालत आक्षेपार्ह वर्तन केल्या प्रकरणी ही कारवाई करण्यात आल्याची माहिती कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष रामदास कदम यांनी दिली.

****

अकरावा गोविंद सन्मान ज्येष्ठ संगीत गुरु विदुषी सीताभाभी राममोहन राव यांना जाहीर झाला आहे. अकरा हजार रुपये, सन्मानपत्र आणि शाल असं या पुरस्काराचं स्वरुप आहे. सीताभाभी या गेली सात दशकं संगीत क्षेत्रात कार्यरत आहेत. येत्या २८ मार्चला छत्रपती संभाजीनगर इथं गोविंद देशपांडे स्मृती सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

****

धाराशिव नगरपरिषदेअंतर्गत दलित वस्तीच्या विकास कामांचा अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे यांनी काल आढावा घेतला. काही ठिकाणी अद्याप पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, तसंच सांडपाणी व्यवस्था आदी सुविधा पुरेशा प्रमाणात नसल्याचं निदर्शनास आलं असून, या समस्या तातडीने सोडवण्याचे निर्देश लोखंडे यांनी दिले.

****

इयत्ता बारावीच्या परीक्षा ११ फेब्रुवारीपासून तर दहावीच्या परीक्षा २१ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहेत. लातूर जिल्ह्यात या दोन्ही परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झालं आहे. या अनुषंगाने करण्यात आलेल्या पूर्वतयारीचा काल जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आढावा घेतला. या परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने प्रभावी उपाययोजना करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

****

जालना इथल्या महाराष्ट्र जीवन प्राधीकरण विभागातला लिपीक अमोल येन्नावार याला आठ हजार रुपये लाच स्वीकारताना काल पकडण्यात आलं. विभागात भाडेतत्वावर असलेल्या चारचाकी वाहनाच्या चालकाचं बिल मंजूर करण्यासाठी त्याने ही लाच मागितली होती.

****

नांदेड इथं काल दिव्यांग मुला–मुलींच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेचं उद्घाटन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या सचिव दलजीत कौर जज यांच्या हस्ते झालं. समाज कल्याण विभाग आणि नांदेड जिल्हा परिषदेच्यावतीने जागतिक दिव्यांग दिनाच्या निमित्ताने या स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे.

****